# श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई

ई-निविदा सुचना क्र.सुरक्षा रक्षक/चर्चगेट/२०२५/३०     दिनांक : १६/०५/२०२५

## संक्षिप्त ई-निविदा सुचना

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या चर्चगेट, जुहू, पुणे, गिरगांव (कन्याशाळा) व चंद्रपूर इ. आवारात सुरक्षेची कामे करण्याकरीता नोंदणीकृत पात्र ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा शुल्क, बयाणा रक्कम (EMD) सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) व इतर अटी व शर्ती करीता सविस्तर निविदा सुचना विद्यापीठाच्या संकेतस्थळ www.sndt.ac.in वर उपलब्ध आहे. तसेच ई-निविदा सुचना, अटी व शर्तीसह निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यास व भरण्यास उपलब्ध आहे. अधिक माहिती व तपशिलाकरीता सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई-४०० ०२० यांच्याशी दुरध्वनी क्र.०२२ २२०८९११७ वर संपर्क साधावा.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव

# ई-निविदा

## श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अंतर्गत सुरक्षा पर्यवेक्षक व सुरक्षा रक्षक या संवर्गातील पदे बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यासाठी ई-निविदा.

उपरोक्त संदर्भान्वये सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा रक्षक या संवर्गातील पदे बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करुन घेण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे. श्रीमती ना.दा.ठाकरसी महिला विद्यापीठ विभागासाठी बाह्य यंत्रणेची निवड करण्याची जबाबदारी मा. कुलसचिव यांच्या अध्यक्षते खालील समितीवर सोपविण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे या विभागात सुरक्षा पर्यवेक्षक संवर्गातील ०६ व सुरक्षा रक्षक या संवर्गातील ३६ पदे अनुज्ञेय केलेली आहे. (सदर पदे भविष्यात कमी / जास्त होण्याची शक्यता आहे.)

सदर ई-निविदा सुचना, परिशिष्टे इत्यादी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १९/०५/२०२५ रोजी दुपारी २:३० वाजेपासून दिनांक ०५/०६/२०२५ पर्यंत सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे.

१. निविदेचा तपशिल :-

| | |
|---|---|
| निविदा संदर्भ | सुरक्षा रक्षक/चर्चगेट/२०२५/३० |
| कामाचे अंदाजित वार्षिक खर्च | रु.१,४०,००,०००/- |
| निविदा शुल्क | रु.२,०००/- अधिक जी.एस.टी. |
| बयाना रक्कम (EMD) | रु.२,८०,०००/- |
| निविदा प्रसिध्द दिनांक | १९/०५/२०२५ |
| निविदा उपलब्ध दिनांक | १९/०५/२०२५ |
| संपर्क अधिकारी | कुलसचिव यांचे कार्यालय, १ नाथीबाई ठाकरसी रोड, न्यु मरीन लाईन्स, मुंबई-४०० ०२०. |
| निविदा अर्जाच्या किंमतीचा ऑनलाईन पध्दतीने भरलेली पावती, बयाना रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरलेली पावती व निविदेसंबंधी आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करणेचा कालावधी | दिनांक १९/०५/२०२५ ते दिनांक ०५/०६/२०२५ |
| निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | ०५/०६/२०२५ सायंकाळी ०६:०० पर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | ०९/०६/२०२५ |
| निविदा प्री-बिड मिटिंग | २६/०६/२०२५ |
| निविदा वैधता कालावधी | १२० दिवस |
| निविदा उघडण्याचे ठिकाण | १ नाथीबाई ठाकरसी रोड, न्यु मरीन लाईन्स, मुंबई-४०० ०२०. |

२. सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा रक्षक या संवर्गातील पदे बाह्ययंत्रणेद्वारे पुरवठा करणे व आवश्यक असलेली कागदपत्रांविषयी माहिती व सुचना-

**सध्या तीनही पाळ्यांमध्ये आवश्यक असणाऱ्या सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा रक्षक यांची कॅम्पस निहाय एकूण संख्या खालीलप्रमाणे :**

| आवार | सुरक्षा पर्यवेक्षक | सुरक्षा रक्षक | |
|---|---|---|---|
| | पुरुष | पुरुष | महिला |
| चर्चगेट | - | - | - |
| जुहू | ०३ | ०३ | ०३ |
| पुणे | ०३ | २१ | ०३ |
| कन्याशाळा, गिरगांव | | ०३ | |
| चंद्रपूर | | ०३ | |
| एकूण | ०६ | ३० | ०६ |

०६ सुरक्षा पर्यवेक्षक व ३६ सुरक्षा रक्षक अशा ४२ सुरक्षा मनुष्यबळाची आवश्यकता आहे. (सदरहू सुरक्षा मनुष्यबळ भविष्यात कमी/जास्त होण्याची शक्यता आहे.)

सुरक्षा पर्यवेक्षक व सुरक्षा रक्षक या संवर्गातील पदे यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या :-

१. सुरक्षा पर्यवेक्षकाने पोलीस/होमगार्ड यांचे भरतीकरीता असणारी शैक्षणिक व शारीरिक अर्हता धारण करणे अनिवार्य आहे.
२. कर्तव्यावर असताना गणवेशात सतर्क राहणे.
३. सुरक्षा रक्षकांच्या ड्युटी पोस्टचे वाटप करणे, दररोज सुरक्षा रक्षकांना बदलत्या पोस्टवर नेमावे.
४. विद्यापीठात येणाऱ्या अभ्यागतांची नोंद रजिस्टरवर होते अथवा नाही याची खात्री करणे.
५. मुख्य प्रवेशद्वार आणि विद्यापीठातील विविध ठिकाणी नेमलेल्या सुरक्षा रक्षकांच्या कामावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवावे.
६. पाळीमध्ये दर तासाला संपूर्ण विद्यापीठ आवाराची गस्त घेणे आणि विद्यापीठात विविध ठिकाणी नेमलेल्या सुरक्षा रक्षकांवर नियंत्रण ठेवणे.
७. विद्यापीठात येणाऱ्या व जाणाऱ्या सामानाची गेटपास प्रमाणे तपासणी होत किंवा नाही याची खात्री करणे.
८. विद्यापीठातील विविध विभागांकडून अथवा कर्मचाऱ्यांकडून सुरक्षा समस्येबाबत फोनवर माहिती मिळाल्यास त्वरीत ती विद्यापीठाच्या सुरक्षा अधिकारी अथवा सुरक्षा पर्यवेक्षकांना देणे.
९. कामाव्यतिरिक्त मुख्य प्रवेशद्वारवर कोणालाही थांबू न देणे तसेच कोणाबरोबर गप्पा मारु नये.
१०. आपात्कालीन परिस्थितीत विद्यापीठाच्या सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा अधिकारी यांच्या आदेशानुसार मुख्य प्रवेशद्वारावर हजर राहून तेथील परिस्थिती हाताळणे.
११. विविध सुरक्षा पोस्टवर नेमलेल्या सुरक्षा रक्षकांना त्यांच्या कर्तव्याबाबत आवश्यक असेल तेथे लेखी/तोंडी सुचना देणे आणि त्या सुचनांचे पालन होते किंवा नाही याची खातरजमा करणे.

१२. कर्तव्यावर आलेल्या सुरक्षा रक्षकांचे गणवेश इतर टर्नआऊटबाबत पाळी वाटप करताना पाहणी करणे व सुरक्षा रक्षकांना कामाबाबत आवश्यक असणाऱ्या सूचना देणे.
१३. सुरक्षा रक्षकांच्या रजेचे नियंत्रण करणे तसेच ड्युटीवाटप करताना कोणताही भेदभाव न करता सुरक्षा रक्षकांना ड्युटी देणे.
१४. रजेवर जाणाऱ्या सुरक्षा रक्षकांना विद्यापीठाच्या सुरक्षा अधिकारी/सुरक्षा पर्यवेक्षक रजेवर जाण्यास परवानगी देणे आणि त्या कालावधीत पर्यायी सुरक्षा नेमणे.
१५. विद्यापीठाचे सुरक्षा अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन करणे इ.

सुरक्षा रक्षक यांची कर्तव्य :-

१. सुरक्षा रक्षकाने पोलीस / होमगार्ड यांचे भरतीकरीता असणारी शैक्षणिक व शारीरिक अर्हता धारण करणे अनिवार्य आहे.
२. कर्तव्यावर असताना गणवेशात सतर्क राहणे.
३. प्रवेशद्वार आवश्यकतेनुसार बंद ठेवणे अथवा उघडणे.
४. अभ्यांगन, अधिकारी, कर्मचारी, कंत्राटी अधिकारी यांच्याशी सौजन्याने वागणे.
५. विद्यापीठात प्रवेश करणाऱ्या अभ्यागतांची योग्य ती तपासणी करणे आणि रजिस्टरमध्ये नोंद घेऊनच आत सोडणे.
६. विद्यापीठाच्या आत येणाऱ्या सामानाची तपासणी करुन संबंधीत रजिस्टरमध्ये नोंद घेणे.
७. विद्यापीठ प्रवेशद्वाराजवळ कोणत्याही व्यक्ती बसू अथवा थाबू न देणे. मोकाट जनावरांना प्रवेश न देणे.
८. विद्यापीठाच्या सुरक्षा अधिकारी, सुरक्षा पर्यवेक्षक, कंत्राटी सुरक्षा पर्यवेक्षक यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे.
९. कर्तव्य बजावत असताना येणाऱ्या अडचणी व आढळणाऱ्या त्रुटी सुरक्षा अधिकारी अथवा सुरक्षा पर्यवेक्षक यांच्या नजरेस आणून देणे व कार्यप्रणालीत अधिकाधिक सुधारणा करण्यास मदत करणे.
१०. कोणतेही सामान, सामानाचे भरलेले वाहन, लोडिंग करीता येणारी रिकामी वाहने यांना सुरक्षा अधिकारी/सुरक्षा पर्यवेक्षक यांच्या परवानगीनेच प्रवेश देणे.
११. शिष्टाचाराचे तंतांतंत पालन करणे/सकारात्मक धोरण अंगिकारणे.
१२. प्रवेशद्वारामधून येणाऱ्या व जाणाऱ्या सामानाची व वाहनाची गेटपासनुसार तपासणी करुन संबंधित रजिस्टरमध्ये नोंद घेऊन सामान बाहेर सोडणे.
१३. योग्यरीत्या चार्ज दिल्या / घेतल्याशिवाय कर्तव्यस्थान सोडू नये.
१४. संशयीत वस्तू अथवा व्यक्ती आढळून आल्यास सुरक्षा पर्यवेक्षकांशी त्वरीत संपर्क साधणे.
१५. विद्यापीठाच्या निरनिराळ्या धोरणांची / योजनांची अंमलबजावणी करणे इ.

**परिशिष्ट**

**बाह्य यंत्रणेद्वारे सुरक्षा पर्यवेक्षक आणि सुरक्षा या संवर्गातील पदे उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक असलेली कागदपत्रे.**

**निविदेत नमूद केल्याप्रमाणे, श्रीमती ना.दा.ठाकरसी महिला विद्यापीठ अंतर्गत सुरक्षा पर्यवेक्षक व सुरक्षा रक्षक या संवर्गातील पदे बाह्ययंत्रणेद्वारे श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई विभागासाठी उपलब्ध करुन द्यावयाची आहेत. यासाठी कामाचा पुरेसा अनुभव असलेल्या सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या बाह्ययंत्रणेकडून ई-निविदा प्रणालीद्वारे एक लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. या कामासाठी खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती लागू राहतील.**

१. ई-निविदा शुल्क २०००/- अधिक जी.एस.टी. Online पध्दतीने SBI NET BANKING किंवा NEFT द्वारे भरणा करावा. (बयाना रक्कम EMD भरलेली नसल्यास निविदेचा विचार करता येणार नाही.)

२. निविदा स्विकृतीचा कालावधी दिनांक १६/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा ते दिनांक ०३/०६/२०२५ रोजी सायं ६.०० वाजेपर्यंत असून सदर निविदा दिनांक ०५/०५/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता मा.कुलसचिव यांचे समक्ष उघडण्यात येतील.

३. सदर ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

४. सदर ई-निविदेत खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रति अपलोड करणे अनिवार्य आहे. तसेच या सर्व बाबींची पूर्तता असणारे निविदाधारकच गुणांकासाठी पात्र ठरतील.

५. निविदाधारक हा कंपनी अधिनियम १९५६ अंतर्गत नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे. सोबत नोंदणी प्रमाणपत्र, कंपनीची नियमावली व मसुदा जोडावे.

६. निविदाधारकाकडे खाजगी सुरक्षा मनुष्यबळ पुरविण्याचा परवाना (PSAR Licence) अनिवार्य आहे.

७. पॅन कार्ड/टॅन कार्ड अनिवार्य.

८. वस्तू व सेवा कर नोंदणी वैध प्रमाणपत्र अनिवार्य.

९. कर्मचारी भविष्य निवार्ह निधी संघटन कार्यालय यांचेकडील EPFO नोंदणी प्रमाणपत्र (मागील ३ वर्षाचे ESR Statement व ESR Payment Receipt जोडणे आवश्यक)

१०. राज्य कर्मचारी विमा कार्यालय (ESIC) यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य.

११. कामगार कल्याण निधी कार्यालय यांचेकडील किमान नोंदणी प्रमाणत्र अनिवार्य. (वर्ष २०२३-२४ चे किमान १०० पेक्षा अधिक सुरक्षा मनुष्यबळाचे चलन भरलेली पावती अनिवार्य)

१२. कामगार उपायुक्त कार्यालय यांचेकडील किमान १०० पेक्षा अधिक सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा केल्याचे Contract Labour Act 1970 अंतर्गत Labour Licence अनिवार्य.

१३. व्यवसायकार नोंदणी प्रमाणपत्र मागील तीन वषाचे २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ चे ना देय (No Dues) प्रमाणपत्र अनिवार्य.

१४. आर्थिक वर्ष २०२२-२३ आर्थिक वर्ष २०२३-२४ चे आयकर विवरणपत्र अनिवार्य.

१५. निविदा धारकाची मागील ३ वर्षामध्ये (आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४) यांचे टर्न ओव्हर सर्टिफिकेट (UDIN क्रमांकासहित) जोडणे अनिवार्य.

१६. आर्थिक वर्ष २०२१-२२, आर्थिक वर्ष २०२२-२३, आर्थिक वष २०२३-२४ चे सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले संपुर्ण लेखापरिक्षण विवरणपत्र अनिवार्य.

१७. निविदा धारकाने एक किंवा अधिक शासकीय कार्यालयामध्ये किमान १०० सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा केल्याचे प्रधिकृत अधिकाऱ्याचे अनुभव प्रमाणपत्र अनिवार्य. या पुरवठा केलेल्या मनुष्यबळाचे मागील ६ महिन्याचे EPF भरत असल्याचे ECR Statement व Payment Receipt जोडणे अनिवार्य.

१८. निविदा धारकाला शासकीय/निमशासकीय/केंद्रशासकीय कार्यालयांना सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा करण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव अनिवार्य.

१९. निविदा धारकाने सुरक्षा मनुष्यबळ करण्याचे एकाच निविदेद्वारे किमान रुपये १.५ कोटी इतक्या रकमेचे काम पूर्ण केलेले सक्षम अधिकाऱ्याचे स्वाक्षरीत प्रमाणपत्र अनिवार्य.

२०. शासकीय/निमशासकीय/केंद्रशासकीय कार्यालयामध्ये काळ्या यादीत नाव समाविष्ट नसलेबाबतचे प्रमाणपत्र (Affidavit करुन) रु.१०० च्या बॉंडपेपरवर सादर करणे.

२१. निविदा धारकाकडे ISO 9001 (Quality Management System) आणि ISO (Occupational Health & Safety Management System) प्रमाणपत्र असणे अनिवार्य.

२२. निविदा धारकाने किमान रु.१.५ कोटी चे राष्ट्रीयकृत बॅंकेचे Solvency certificate जोडणे अनिवार्य.

२३. निविदा धारकाशी संपर्क करण्यासाठी निविदा धारकाचे संपर्क कार्यालय मुंबई, ठाणे, नवी मुंबई या ठिकाणी असावे.

२४. निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र अनिवार्य.

२५. निविदा शुल्क व ई.एम.डी. रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरलेली पावती जोडणे अनिवार्य.

२६. निविदा धारकावर दाखलपात्र गुन्हा नोंद नसल्याचे पोलीस खात्याचे वैध प्रमाणपत्र अनिवार्य.

२७. निविदा धारक माजी सैनिक असल्यास आणि त्यांची संस्था वरील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास सदरील संस्थेला प्राधन्य देण्यात येईल.

२८. निविदा धारकास महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार सुरक्षा पर्यवेक्षक अणि सुरक्षा रक्षक यांना वेतन देणे बंधनकारक राहील याची अंमलबजावणी निविदा धारक संस्थेने न केल्यास त्यांची सेवा ताबडतोब संपुष्टात आणण्यात येईल.

२९. ज्य बाह्य यंत्रणा संस्थेला काम मंजूर करण्यात येईल तिला कामाचा आदेश देण्यापूर्वी त्यांचेकडून रक्कम रु.५००/- च्या बॉंडपेपरवर विद्यापीठाने निविदेमध्ये निश्चित केलेल्या अटी व शर्तीसह करारनामा करुन घेण्यात येईल.

३०. करारनाम्याचा कालावधी प्रथमत: एक वर्षाचा राहील, संस्थेचे काम समाधानकारक राहील्यास पुढील आणखी दोन वर्षापर्यंत मुदतवाढ देखील करण्यात येईल. मात्र अटी व शर्तीचा अधिकार मा. कुलसचिव यांचा राहिल.

३१. निविदा मंजूर करणे अगर नाकारणे आणिक आवश्यक वाटल्यास विभागून देणे हे अधिकार मा. कुलसचिव यांनी राखून ठेवले आहेत. निविदेतील कोणताही भाग अथवा सर्वच निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा किंवा स्विकारण्याचा हक्क मा. कुलसचिव यांनी राखून ठेवले अहे. एकापेक्षा जास्त निविदा धारकांचे गुण एकसमान असल्यास अंतिम निविदा धारक निवडण्याचा सर्वाधिकार निवड समितीला राहील.

**सर्वसाधारण सुचना :-**

- **सुरक्षा अनामत** (Security Deposit)/Performance Bank Guarantee **ज्या निविदा धारकांची निविदा स्विकृत केली जाईल त्या निविदा धारकाने ३ टक्के म्हणजेच अंदाजे रु.४,२०,०००/- इतकी रक्कम** Demand Draft **किंवा** Bank Guarantee **स्वरुपात भरणे आवश्यक राहील.**
- बाह्य यंत्रणेकडून पुरविण्यात येणाऱ्या तांत्रिक मनुष्यबळाची पात्रता :-
- सुरक्षा रक्षक :

  १. वय :- किमान ३० वर्ष व कमाल ४५ वर्षापेक्षा जास्त असू नये.
  २. शैक्षणिक पात्रता :- १० वी/ एस.एस.सी. पास.
  ३. अनुभव :- किमान २ वर्ष.
- सुरक्षा पर्यवेक्षक :

  १. वय :- किमान ३५ वर्ष व कमाल ४५ वर्षापेक्षा जास्त असू नये.
  २. शैक्षणिक पात्रता :- १२ वी /एच.एस.सी. पास
  ३. अनुभव :- किमान ५ वर्ष.
- देयमानधन

बाह्य यंत्रणेने वरील पात्रतेप्रमाणे सुरक्षा मनुष्यबळ उपलब्ध करुन दयावयाचे आहे. निविदेमध्ये नमूद केलेल्या मागणीनुसार विभागास अनुज्ञेय असलेल्या सुरक्षा मनुष्यबळाची संख्या लक्षात घेता सुरक्षा मनुष्यबळ उपलब्ध करुन दयावे लागेल. उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुरक्षा मनुष्यबळास बाह्य यंत्रणेने महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार वेतन दिले जाईल. (यावर सुरक्षा मनुष्यबळ यंत्रणेने एकूण देयकाच्या किती टक्के सेवा शुल्क स्वरुपात आकारण्यात येईल याचा उल्लेख करण्यात यावा. शासनाच्या किमान वेतन कायद्याच्या अनुषंगाने मानधन आणि त्यावर आकारण्यात येणारे सेवा शुल्क (Service Charge) यांची बेरीज करुन त्यावर १८% (G.S.T.) अंतर्भूत करुन कंपनीस मानधन अदा करण्यात येईल.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुरक्षा मनुष्यबळास कामाच्या अनुषंगाने जिल्ह्याबाहेर इतर कामांसाठी प्रवास करावा लागल्यास यासाठी त्यांना प्रवास भत्ता व पदास देय असणाऱ्या तरतूदीप्रमाणे देण्यात येतील. विद्यापीठ सुरक्षा मनुष्यबळास दिलेल्या मानधनाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारच्या कमी अदायगी/चुकीची अदायगी बाबत जबाबदार राहणार नाही. सुरक्षा मनुष्यबळ यांच्या सेवा पुरविताना कामगार कायद्यातील अनुषंगिक सर्व बाबींची पूर्तता करावयाची असून त्या अनुषंगाने सर्व प्रकारच्या दायित्वाही जबाबदारी बाह्य यंत्रेणेची राहील. दरमहा झालेल्या कामाच्या अनुषंगाने देयकाची मागणी संबंधित अधिकारी यांच्याकडे ५ तारखेच्या आत कंपनीने करावी. कंपनीच्या या मागणीच्या अनुषंगाने १५ तारखेपर्यंत संबंधित अधिकारी हे पडताळणी करुन मानधन अदा करतील. वरील प्रमाणे कंपनीकडून प्राप्त मागणीबाबत संबंधित अधिकारी हे खात्री पटवून प्रमाणित करुन घेतील व देयक अदायगीची कार्यवाही करतील. असे देयक अदा करतांना तांत्रिक सुरक्षा मनुष्यबळ निहाय मानधनाची रक्कम व त्या अनुषंगाने मानधनाच्या रक्कमेवर कंपनीचा सर्वीस चार्ज (सेवा शुल्क) याची एकत्रित बेरीज करुन यावर १८% वस्तु व सेवा कर याबाबत उचित कार्यवाही करुन कंपनीस मानधन अदा करतील. कंपनीस मानधन रक्कम अदायग करतांना धनादेश/धनाकर्ष/आरटीजीएस यासारख्या पारदर्शक पध्दतीने

कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे कंपनीने सुरक्षा मनुष्यबळास देखील याच पारदर्शक पध्दतीने मानधन रक्कम वितरित करावी. असे करताना कंपनीने त्यांचा मासिक व्यवसाय कर हा सुरक्षा मनुष्यबळाच्या देय मानधनातून नियमाप्रमाणे कपात करुन शासनखाती जमा करावे.

संस्थेने वस्तु व सेवा कर क्रमांक तसेच पॅन कार्ड क्रमांक इ. विद्यापीठाच्या संबंधित अधिकारी व कार्यालयास उपलब्ध करुन द्यावा जेणेकरुन कराची कपात करणे व इतर अनुषंगिक बाबी सुकर होतील.

➢ व्यवस्थेचा कालावधी :-

बाह्ययंत्रणेची निवड ही प्रथमत: एका वर्षासाठी राहील. बाह्ययंत्रणेचे काम समाधानकारक असल्यास याबाबतचा आढावा घेऊन पुढील २ वर्षापर्यंत मुदतवाढ देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. बाह्ययंत्रणेचे काम समाधानकारक नसल्यास त्यांचे काम संपुष्टात आणण्याचे सर्व अधिकार मा. कुलसचिव यांनी राखून ठेवलेले आहेत.

बाह्ययंत्रणेस पुरवठा/सेवा संपुष्टात आणावयाची असल्यास किमान एक महिना अगोदर मा. कुलसचिव यांना लेखी स्वरुपात कळविण्यात यावे. अशावेळी गुणानुक्रमे पुढील क्रमाने पात्र संस्थेची निवड मा.कुलसचिव हे करतील पुन्हा निविदा मागविण्याची आवश्यकता राहणार नाही.

➢ इतर बाबी :-

❖ सुरक्षा मनुष्यबळास मा.कुलसचिव/सुरक्षा अधिकारी अंतर्गत नियुक्त केलेल्या ठिकाणी येथे काम करावे लागेल. सुरक्षा मनुष्यबळ यांना मानधन रक्कम अथवा कोणताही निधी थेट दिला जाणार नाही. कोणत्याही स्वरुपाचा पत्रव्यवहार हा थेट कंपनीशी करण्यात येईल. कंपनीने दरमहा देयकाची मागणी संबंधित अधिकारी यांच्याकडे करावी. संबंधित अधिकारी हे देयकाबाबत खात्री पटवून पाक्षिकाच्या आत देयकाची अदायकी कंपनीस करतील.

❖ कोणत्याही प्रकारच्या विवादास्पद बाबींसाठी मा. कुलसचिव / सुरक्षा अधिकारी यांच्याकडे दाद मागण्यात येईल. मा.कुलसचिव यांचा निर्णय अंतिम राहील.

➢ सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या बाह्य यंत्रणेची निवड :-

सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या बाह्य यंत्रणेस (कंपनी) यांना शासकीय कार्यालयास किमान ३ वर्षाचा सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा करण्याचा अनुभव असला पाहिजे ज्यामध्ये सुरक्षा पर्यवेक्षक / सुरक्षा रक्षक यास सुरक्षा मनुष्यबळ समजण्यात येईल. निविदेमध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रति करणे अनिवार्य आहे. तसेच या सर्व बाबींची पुर्तता असणारे निविदाधारकच गुणांकणासाठी पात्र ठरतील. याप्रमाणे संस्था निवडताना खालील तांत्रिक आणि वित्तीय निकष विचारात घेतले जातील.

| | |
|---|---|
| १. | तांत्रिक सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा |
| २. | मागील ३ वर्षांचे लेखा परिक्षित ताळेबंद |
| ३. | बाह्य यंत्रणेची वित्तिय क्षमता |

**बाह्य यंत्रणांची निवड करताना विचारात घ्यावयाचे गुणांकन**

| अ.क्र. | विवरण | गुणसंख्या | अभिप्राय/विश्लेषण |
|---|---|---|---|
| १ | सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा | १५ | सुरक्षा मनुष्यबळ एकूण गुण |
| २ | मागील ३ वर्षांचे लेखा परिक्षित ताळेबंद | १० | मागील ३ वर्षामध्ये यंत्रणेने सरासरी किती आर्थिक लेखापरीक्षण केलेले आहे त्याप्रमाणे प्रत्येक पर्षासाठी |
| ३ | बाह्य यंत्रणेची वित्तीय क्षमता | २५ | मागील ३ वर्षातील किमान वार्षिक उलाढाल |
| एकूण | | ५० | - |

सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा ५० गुणसंख्येचे विश्लेषण

अ. सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा १५ गुण

| अ.क्र. | मागील ५ वर्षात सरासरी सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा संस्था | गुण |
|---|---|---|
| १ | १ ते ५० | ५ गुण |
| २ | ५१ ते १०० पर्यंत | १० गुण |
| ३ | १०० पेक्षा जास्त (पुढील प्रत्येक ३ संख्येस प्रत्येकी १ गुण) | १५ गुण |

१. मागील ३ वर्षाचे लेखा परिक्षित ताळेबंद १० गुणसंख्येचे विश्लेषण

| अ.क्र. | मागील ३ वर्षामध्ये यंत्रणेने सरासरी किती आर्थिक लेखापरिक्षण केलेले आहे. | गुण |
|---|---|---|
| १ | १ वर्षाचे लेखापरिक्षण | ५ गुण |
| २ | २ वर्षाचे लेखापरिक्षण | ७.५ गुण |
| ३ | ३ वर्षाचे लेखापरिक्षण | १० गुण |

२. बाह्य यंत्रणेची वित्तीय क्षमता २५ गुणसंख्येचे विश्लेषण

| अ.क्र. | मागील ३ वषातील किमान वार्षिक उलाढाल | गुण |
|---|---|---|
| १ | ५० लाख पर्यंत | १० गुण |
| २ | ५० लाख ते १ कोटी | १५ गुण |
| ३ | १ कोटी ते १.५ कोटी | २० गुण |
| ४ | १.५ कोटी पेक्षा जास्त | २५ गुण |

(निविदाकर्त्याने त्यांचा कंपनीच्या लेटर हेडवर लिहिणे)

प्रति,
मा.कुलसचिव,
श्रीमती ना.दा. ठाकरसी महिला विद्यापीठ,
१, नाथीबाई ठाकरसी रोड,
न्यु मरीन लाईन्स,
मुंबई-४०० ०२०.

विषय :- सुरक्षा सेवांसाठी निविदा सादर करणे.

मा. महोदय/महोदया,

मी, श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठाच्या चर्चगेट, जुहू, पुणे, कन्याशाळा (गिरगाव), चंद्रपुर व आवारात सुरक्षा पुरविण्याकरीता सेवा शुल्क दर (Percentage) सादर करीत आहे.:-

चर्चगेट, जुहू, पुणे, कन्याशाळा (गिरगांव) व चंद्रपुर आवार.

| अ.क्र | वर्णन | प्रति महिना ३०/३१ दिवसांसाठी आकारण्यात येणाऱ्या एकुण बिलावर सेवाशुल्क टक्केवारी स्वरुपात किती आकारला जाईल याची नोंद करावी. | शेरा (असल्यास) |
|---|---|---|---|
| १ | सेवाशुल्क | | |

धन्यवाद,

स्वाक्षरी
(नाव व स्टॅंप सहित)

३. निविदा लिफाफा अर्ज.

निविदाकारांनी सदर अटी व शर्ती मान्य असल्याचे नमूद करुन सही व शिक्का निशि सादर करणे.

प्रति,

विषय :- सुरक्षा पर्यवेक्षक आणि सुरक्षा रक्षक इ. सुरक्षा मनुष्यबळ पुरविण्याची निविदा.

दिनांक ...................... आपले कार्यालयाच्या जाहिरातीनुसार ................................ कार्यालयात सुरक्षा मनुष्यबळ पुरविण्याची निविदा भरत आहोत.

| अ.क्र. | तपशिल | आहे नाही | पान क्र. |
|---|---|---|---|
| १ | ई-निविदा खरेदी फी रुपये २,०००/- अनिवार्य | | |
| २ | ई.एम.डी रक्कम रुपय २,८०,०००/- अनिवार्य | | |
| ३ | निविदा धारक हा कंपनी अधिनियम १९५६ अंतर्गत नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे. | | |
| ४ | निविदाधारकाकडे खाजगी सुरक्षा मनुष्यबळ पुरविण्याचे परवाना (PSAR Licence) अनिवार्य आहे. | | |
| ५ | पॅन कार्ड क्रमांक अनिवार्य | | |
| ६ | टॅन कार्ड क्रमांक अनिवार्य | | |
| ७ | वस्तू व सेवा कर नोंदणी वैध प्रमाणत्र अनिवार्य तसेच मागील ३ वषाचे २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ चे ना-देय (No Dues) प्रमाणपत्र अनिवार्य | | |
| ८ | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन कार्यालय यांचेकडील EPFO नोंदणी प्रमाणपत्र किमान २ वर्षाचे १०० पेक्षा अधिक सुरक्षा मनुष्यबळाचे (मागील ३ वर्षाचे ECR Statement व ECR Payment Receipt जोडणे आवश्यक) | | |
| ९ | राज्य सरकारी विमा कार्यालय (ESIC) यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य. | | |
| १० | कामगार कल्याण निधी कार्यालय यांचेकडील नोंदणी पमाणपत्र अनिवार्य. (वर्ष २०२४ चे किमान १०० पेक्षा अधिक सुरक्षा मनुष्यबळाचे चलन भरलेली पावती अनिवार्य) | | |
| ११ | कामगार उपायुक्त कार्यालय यांचेकडील किमान १०० पेक्षा अधिक सुरक्ष मनुष्यबळ पुरवठा केल्याचे Contract Labour Act 1970 अंतर्गत Labour Licence अनिवार्य. | | |
| १२ | व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र मागील तीन वर्षाचे २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ चे ना-देय (No Dues) प्रमाणपत्र अनिवार्य. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | आर्थिक वर्ष २०२१-२२, आर्थिक वर्ष २०२२-२३, आर्थिक वर्ष २०२३-२४ चे आयकर विवरणपत्र अनिवार्य | | |
| १४ | निविदा धारकांची मागील ३ वर्षामध्ये (आर्थिक २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४) यांचे टर्नओव्हर सर्टिफिकेट (UDIN क्रमांकासहित) | | |
| १५ | आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ चे सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले संपूर्ण लेखापरिक्षण विवरणपत्र अनिवार्य | | |
| १६ | निविदा धारकाने एक किंवा अधिक शासकीय कार्यालयामध्ये किमान १०० पेक्षा अधिक सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा केल्याचे प्राधिकृत अधिकाऱ्याचे अनुभव प्रमाणपत्र अनिवार्य. या पुरवठा केलेल्या सुरक्षा मनुष्यबळाचे मागील ६ महिन्याचे EPF भरत असल्याचे ECR Statement व Payment Receipt जोडणे अनिवार्य. | | |
| १७ | निविदा धारकाला शासकीय / निमशासकीय / केंद्रशासकीय कार्यालयांना सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा करण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव अनिवार्य. | | |
| १८ | निविदा धारकाने सुरक्षा मनुष्यबळा पुरवठा करण्याचे एकाच निविदेद्वारे किमान रुपये १.५ कोटी इतक्या रक्कमेचे काम पूर्ण केलेले सक्षम अधिकाऱ्याचे स्वाक्षरीत प्रमाणपत्र अनिवार्य. | | |
| १९ | शासकीस/निमशासकीय/केंद्रशासकीय कार्यालयामध्ये काळ्या यादीत नाव समाविष्ट नसलेबाबतचे प्रमाणपत्र (Affidavit करुन) रु.१०० च्या बॉंडपेपरवर. | | |
| २० | निविदा धारकाकडे ISO 9001 (Quality Management System) आणि ISO (Occupational Health & Saftey Management System) प्रमाणपत्र असणे अनिवार्य | | |
| २१ | निविदा धारकाने किमान रु.१.५ कोटीचे राष्ट्रीयकृत बॅंकेचे Solvency Certificate जोडणे अनिवार्य | | |
| २२ | निविदोच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र | | |
| २३ | निविदा धारकावर दखपात्र गुन्हा नोंद नसल्याचे पोलीस खात्याचे वैध प्रमाणपत्र अनिवार्य | | |
| २४ | माजी सैनिक संस्था वरील अटी व शर्ती मान्य असल्यास सदरील संस्थेला प्राधान्य देण्याचा अधिकार निवड समितीला राहील. | | |
| २५ | निविदा धारकाशी संपर्क करण्यासाठी निविदा धारकाचे संपर्क कार्यालय मुंबई, ठाणे, नवी मुंबई या ठिकाणी असावे. असल्यास पुरावा अपलोड करण्यात यावा. | | |

*************